POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१०४ ● मुंबई, रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबई लोकल पुन्हा होणार ठप्प

### मध्य रेल्वेच्या उपनगरीय रेल्वे प्रवाशांना पुन्हा एकदा गैरसोयीचा सामना करावा लागण्याची शक्यता

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मध्य रेल्वेच्या उपनगरीय रेल्वे प्रवाशांना पुन्हा एकदा गैरसोयीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे गर्दीच्या वेळी आंदोलन केल्यामुळे सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या दोन पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. यानंतर सीआरएमएसने 'नियमानुसार काम' करण्याचा इशारा दिला असून त्यामुळे लोकल सेवा पुन्हा ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मुंब्रा दुर्घटनेत दोन रेल्वे अधिकाऱ्यांवर दाखल झालेला गुन्हा रद्द करावा, अशी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाची मागणी आहे. त्यांच्या मते, व्हीजेटीआयचा अहवाल सदोष असून तो वास्तवाशी जुळत नाही. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात बाह्य संस्था रेल्वे कर्मचाऱ्यांवर खोटे आरोप लावून त्यांना त्रास देत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल खच्ची होत आहे आणि त्यांना रेल्वे प्रशासन किंवा बाहेरील संस्था कोणाचे ऐकावे, असा प्रश्न पडला असल्याचा दावा उफ्टर ने केला आहे. सीआरएमएस ने सीएसएमटी येथील फलकावर इशारा दिला आहे की, "आम्हाला




आमची ओळख टिकवून ठेवण्यासाठी 'नियमानुसार काम' करण्यास भाग पाडू नये."

सीआरएमएसचे अध्यक्ष प्रवीण वाजपेयी यांनी स्पष्ट केलं की, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयासमोरचे आंदोलन संपल्यानंतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे मोटारमन-गार्ड लॉबीसमोर आंदोलन केलं. सीएसएमटी आंदोलनात गुन्हा दाखल होऊन ४८ तास उलटले असले तरी, पोलिसांनी अद्याप आंदोलकांना नोटीस बजावली नाही किंवा अटक केली नाही. रेल्वे पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं की, "सारासर विचार करून तारतम्य बाळगून वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार पावलं टाकण्यात येतील. तूर्त तपास सुरू आहे."

**नेमकं काय घडलं होतं?**

मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ सुमारे ५ महिन्यांपूर्वी धावत्या लोकलमधून पडून ५ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी रेल्वे पोलिसांनी दोन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केल्यानंतर हा गुन्हा रद्द करावा, या मागणीसाठी 'सीआरएमएस'ने काही दिवसांपूर्वी ऐन गर्दीच्या वेळी सीएसएमटी इथं आंदोलन केलं. आंदोलकांनी सीएसएमटी मधील गार्ड आणि मोटरमन लॉबीचा प्रवेशद्वार रोखला. परिणामी लॉबीमध्ये असलेले मोटरमन-गार्ड आत अडकले आणि उरटळ ला लोकल आणणारे मोटरमन-गार्ड बाहेरच राहिले. नोकरदार वर्ग घरी परतण्यासाठी उरटळ मध्ये गर्दी करत असल्याने स्थानकावर प्रचंड गोंधळ उडाला होता. सदर आंदोलनामुळे लोकल खोळंबल्याने सीएसएमटी कडे जाणाऱ्या लोकलमधून चार प्रवाशांनी सॅण्डहर्स्ट रोड स्थानक परिसराजवळ रेल्वे रुळांवर उड्या घेतल्या. मात्र रुळांवरून चालत असताना मागून आलेल्या लोकलने त्यांना धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाला होता.

## मराठवाड्यात १० महिन्यांत ८९९ शेतकऱ्यांनी कवटाळले मृत्यूला



■ **छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आदी कारणांमुळे गेल्या दहा महिन्यांत मराठवाड्यातील ८९९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. यात सर्वाधिक २०० घटना एकट्या बीड जिल्ह्यात घडल्या आहेत. मराठवाड्यात सर्वदूर सिंचनाची सोय नाही. कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने शेतकरी निसर्गावरच अवलंबून आहेत. मागील काही वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा सामना या शेतकऱ्यांना करावा लागत आहे. कधी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान, तर कधी मालाला भाव नाही. त्यामुळे बिघडलेली आर्थिक गणिते, अशा या चक्रात शेतकरी सापडला आहे. या व इतर कारणांमुळे मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येच्या घटनांत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे विदारक चित्र आहे.

**१०२ प्रकरणे मदतीसाठी अपात्र :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. आतापर्यंत ५६० प्रकरणे शासनाच्या आर्थिक मदतीसाठी पात्र ठरली आहेत. २३७ प्रकरणे चौकशी वा निर्णयाकरिता प्रलंबित आहेत. १०२ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी दिली.


**विभागातील शेतकरी आत्महत्या**

| महिना | आत्महत्या |
|---|---|
| जानेवारी | ८८ |
| फेब्रुवारी | ७५ |
| मार्च | ११० |
| एप्रिल | ८९ |
| मे | ७७ |
| जून | ८५ |
| जुलै | १०७ |
| ऑगस्ट | ७६ |
| सप्टेंबर | ८३ |
| ऑक्टोबर | १०९ |
| एकूण | ८९९ |

**गतवर्षी ९८४ आत्महत्या :** मागील वर्षभरात (१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४) मराठवाड्यातील तब्बल ९४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालात नमूद आहे. यात बीड जिल्ह्यात जिल्ह्यात सर्वाधिक २०५ आत्महत्यांची नोंद झाली. त्या पाठोपाठ नांदेड जिल्ह्यात १६७, तर छत्रपती संभाजीनगरात १५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या.

यंदाही उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागला. सोबतच काही भागात गारपिटीसह अवकाळी पावसाने पिकांना फटका बसला. खरीप हंगामात अतिवृष्टी, पूर यामुळे मराठवाड्यात लाखो हेक्टरवरील पिके पाण्यात गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पिकांच्या नुकसानपोटी शासनाने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मदतनिधी घोषित केला असून, अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. दरम्यान, जानेवारी ते ऑक्टोबरअखेरपर्यंत मराठवाड्यातील ८९९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात सर्वाधिक म्हणजे २०० आत्महत्येच्या घटना एकट्या बीड जिल्ह्यात झाल्या. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १७१ जणांनी, तर नांदेड जिल्ह्यात १४५ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. धाराशिव जिल्ह्यात ११५, जालना ५८, परभणी ९०, हिंगोली ५३, लातूर जिल्ह्यात ६७ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.

## 'अस्वास्थ्य'कारी प्रदूषण! वडाळा, कुलाबा सर्वाधिक प्रभावित... शहरावर थंड वारा, धुक्याची चादर



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील थंड वाऱ्याने रहिवाशांना हिवाळ्याची चाहूल लागली. मात्र, शहरावर पसरलेल्या धुक्याच्या थराने वायुप्रदूषणाचे चिंताजनक चित्र समोर आले आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, शुक्रवारीही दिवसभर आकाश स्वच्छ राहणार असून दिवसाचे तापमान ३२त अंश आणि किमान तापमान १९ अंशपर्यंत खाली जाण्याची शक्यता आहे. यामुळे सकाळच्या वेळात हलकी गारवा जाणवेल. तथापि, हवामान आनंददायी असले तरी सकाळी दृश्यमानता मोठ्या प्रमाणात कमी झाली होती, कारण शहरभर धुक्याची आणि स्मॉगची साचलेली पातळी वाढली होती.

गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे काही काळ हवेतील प्रदूषण कमी झाले होते आणि ओलावा वाढल्याने वातावरण स्वच्छ झाले होते. तो प्रभाव अल्पकाळ टिकला. पाऊस थांबल्यानंतर मुंबईचा एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) पुन्हा एकदा अस्वास्थ्यकर श्रेणीत घसरला आहे.

## शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का

### भाजप, अजितदादा गटाची पत्रकार परिषदेत मोठी घोषणा

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे, निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता सर्वच पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. दरम्यान यावेळी परिस्थिती वेगळी आहे, म्हणजे सर्वच ठिकाणी या निवडणुका महायुती आणि महाविकास आघाडी म्हणून लढवल्या जात नसून, अनेक ठिकाणी पक्षांनी स्थानिक पातळीवर आपआपल्या सोईनुसार युती, आघाडी केल्याचं पहायला मिळत आहे. कोल्हापूरच्या चंदगडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटानं युती केली आहे. दरम्यान आता एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे, ती म्हणजे रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे.

रायगड हा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा बालेकिल्ला मानला जातो. तसेच शिवसेना शिंदे गटाचे नेते भरत गोगावले यांचं देखील या जिल्ह्यावर चांगलं वर्चस्व आहे. पालकमंत्रिपदावरून देखील हा जिल्हा चांगलाच चर्चेत आला होता, रायगडचं पालकमंत्रिपद आदिती तटकरे यांना देण्यात आल्यानं भरत गोगावले चांगलेच नाराज झाले होते, अजूनही रायगडच्या पालकमंत्रिपदाचा



तिढा सुटलेला नाहीये, त्यातच आता रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटाला भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटानं मोठा धक्का दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील पहिली भाजपझ्रराष्ट्रवादी काँग्रेस युती महाड नगर परिषद निवडणुकीसाठी जाहीर झाली असून, महायुतीत फूट पडल्याचे संकेत मिळत आहेत. संयुक्त पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी यासंदर्भात घोषणा केली आहे. नगराध्यक्ष पदासह १६ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस, तर ५ जागांवर भारतीय जनता पक्ष उमेदवार रिंगणात उतरवणार आहे. या निर्णयामुळे शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला असून, महाडमध्ये राष्ट्रवादीझ्रभाजप विरुद्ध शिवसेना अशी त्रीकोनी लढत रंगणार आहे. या पत्रकार परिषदेला माजी नगराध्यक्षा स्नेहल माणिकराव जगताप, भाजप जिल्हा सरचिटणीस बिपिन म्हमुनकर यांची देखील उपस्थिती होती. हा रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

## पुण्यात वारंवार होणाऱ्या अपघांतामुळे नागरिक त्रस्त, महामार्गावर प्रशासनाविरोधात तिरडी आंदोलन



■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी आज नऱ्हे परिसरात वाढत चाललेल्या अपघातांच्या मालिकेमुळे सातारा - मुंबई राष्ट्रीय मार्ग रोखून आंदोलन केले आहे. यावेळी प्रशासनाची तिरडी बांधून रस्त्यावर मांडून निषेध नोंदवला आहे. अंत्ययात्रा आणि अंत्यविधीचे प्रतीकात्मक आयोजन करून नागरिकांनी शासनाला जाग होण्याची साद घातली आहे. अलीकडच्या अपघातात लहान मुलीसह कुटुंबाची झालेली होरपळ पाहून. ''या भागात मृत्यूंची मालिका सुरू आहे. प्रशासन काहीच करत नाही. असेच चालू राहिले तर लोकांना जगण्यापेक्षा आत्महत्या करावीशी वाटेल,'' अशी वेदनादायी भावना भूपेंद्र मोरे यांनी व्यक्त केली आहे. जय हरी वडगाव आणि आसपासचे नागरिकही भीतीच्या सावटाखाली आहेत.

या आंदोलनात भुपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान जवळपास दोन तास साताराझ्रमुंबई महामार्गावरील वाहतूक ठप्प करण्यात आली होती. मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना कराव्यात, रस्त्यांची पाहणी करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी मोरे म्हणाले, ''शासनाचे अधिकारी पाहणी करून जातात, आश्वासने देतात, पण बदल काहीच होत नाही. आमचे जीव गेले तरी प्रशासन जागे होत नाही. तुम्ही केलेल्या मदतीने ते जीव पुन्हा येणार नाहीत. त्यामुळे भविष्यात अशा घटना घडून नयेत यासाठी आपण उपाययोजना करणे गरजेचे आहे.''

**नेमकं काय घडलं?**

कंटेनर नवले पुलाच्या पुढे असणाऱ्या बोगद्यातून पुण्याच्या दिशेन येत होता. उतारावर कंटेनरचा ब्रेक फेल झाला. यानंतर कंटेनरने समोर येतील त्या सगळ्या गाड्यांना धडक दिली. चेंडूप्रमाणे गाड्या रस्त्यावर उडत होत्या. जवळपास 3 किमी कंटेनर वाहनांना धडक देत होता. २० ते २५ गाड्यांना कंटेनरने धडक दिली. एका क्षणी कंटेनरने दुसऱ्या एका कंटेनरला धडक दिली. यावेळी कार दोन्ही कंटेनरच्या मधे अडकली आणि आग लागली. कार बाहेर पडण्यासाठी जाग नसल्याने आतील प्रवाशांसह ती जळाली आणि राख झाली. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवलं. आग लागल्यानंतर क्रेनच्या माध्यमातून कंटेनर आणि कारला काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसंच अपघातग्रस्त वाहनांना बाजूला काढण्यात आलं. रस्त्यावर काचा आणि रक्ताचा सडा पडला आहे. गाड्यांचा अक्षरशः चुराडा झाला असून लोकांनी पाहण्यासाठी गर्दी केली आहे. तसंच अपघातानंतर तिथे मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. काही दुचाकींनाही कंटेनरने धडक दिली. मृतांची संख्या अजून वाढण्याची शक्यता आहे.

## पुणे - नवले पुलावर अपघातात ९ ठार!

### कंटेनरने चेंडूंप्रमाणे गाड्यांना उडवलं... कारसह प्रवासीही जळाले

■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील नवले पुलावर भीषण अपघात झाला आहे. कंटेनरने २० ते २५ वाहनांना चेंडूप्रमाणे उडवत त्यांचा अक्षरशः चुराडा केला आहे. अपघात इतका भीषण होता की, दोन कंटेनरच्या मधे एक कार अडकली होती. अपघातामुळे कंटेनरला आग लागल्यानंतर ही कार प्रवाशांसह जळाली. आगीनंतर कारची राख झाली आहे. या अपघातात आतापर्यंत ९ जणांचा



मृत्यू झाला आहे. कंटेनर चालकही अपघातात ठार झाला आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

## पालघरमध्ये तटरक्षक दलाच्या तातडीच्या मदतीमुळे वाचले ५ जणांचे प्राण

■ **पालघर। प्रतिनिधी,**

वाढवण समुद्रकिनाऱ्या नजीक समुद्रात अमृत-१६ ही टग बोट बुडाल्याची घटना घडली आहे. बोटीवर असलेल्या सहा खलाशी कर्मचारी पाच जणांना वाचवण्यात तटरक्षक दलाला यश आले असून एक जण बेपत्ता आहे. राहुलकुमार यादव असे बेपत्ता खलाशाचे नाव असून त्याचा शोध सुरू आहे.

अमृत-१६ ही टगबोट गस्तीसाठी मुंबई दारूखाना येथून शनिवारी निघाली होती. बुधवारी पहाटेच्या सुमारास वाढवण समुद्रकिनाऱ्यापासून दहा नॉटिकल माइल अंतरावर ही बोट नांगर टाकून थांबली होती. अचानक बोटीच्या अभियंता कक्षात (यंत्राच्या खोलीत) पाणी शिरू लागल्याचे अभियंत्याच्या निदर्शनास आले. बोटीत पाणी साचू लागल्याने बोट बुडू लागली. यावेळी बोटीवरील सहा खलाशी कर्मचाऱ्यांपैकी पाच जणांनी वेळीच बोटीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. पण, यावेळी राहुलकुमार यादव हा खलाशी बेपत्ता झाला आहे. पाच बचावलेल्या खलाशांनी नजीकच असलेल्या अन्नपूर्णा टगबोटीकडून मदत मागितली.

त्यानंतर अन्नपूर्णा टगबोटीवरील कर्मचाऱ्यांनी समुद्रात असलेल्या पाच जणांना सुरक्षित बोटीवर आणले. सागरी बचाव समन्वय केंद्राला (मुंबई) अमृत-१६ ही बुडाल्याची माहिती मिळताच याबाबतची माहिती तटरक्षक दल केंद्र डहाणू येथे देण्यात आली.

भारतीय तटरक्षक दल केंद्र डहाणू येथून कमांडर जितु आय. जोस यांच्या मार्गदर्शनाखाली तटरक्षक दलाची आयसी-११७ ही गस्ती- नौका तत्काळ घटनास्थळी रवाना करण्यात




पवन विष्णू राम (वय २९), धर्मेंद्रकुमार नंदकिशोर सिंग (वय ४३), गोविंदकुमार विदेश्वर महतो (वय १९), सुरज विश्वकर्मा (वय ३८), जदन रघुवीरसिंग पठाणीया (वय ३०) अशी या बोट दुर्घटनेत बचावलेल्या खलाशी कामगारांची नावे आहेत. त्यांना डहाणू उपजिल्हा रुग्णालय, आगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. यापैकी तिघांची प्रकृती सुरुवातीला गंभीर होती, मात्र सध्या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर भोये यांनी दिली आहे.

आली. बुधवारी पहाटेच्या सुमारास तटरक्षक दलाने या पाचही कर्मचाऱ्यांना बचावलेल्या पाच खलाशी कामगारांना सुखरूपपणे बुधवारी सकाळी नऊ वाजताच्या डहाणू किनाऱ्यावर आणले.

तटरक्षक दलाच्या वेळेवर आणि धाडसी कारवाईमुळे पाच खलाशी जीव वाचले असले तरी, बेपत्ताचा शोध घेण्यासाठी तटरक्षक दलाचे शोध आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## अनुकूल निकालासाठी मागितली २५ लाखांची लाच

### अतिरिक्त सत्र न्यायाधीशांवर गुन्हा, लिपीक अटकेत

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

माझगाव येथील दिवाणी न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत याचिकाकर्त्याच्या बाजूने निकाल देण्यासाठी २५ लाख रुपयांची लाच मागणाऱ्या अतिरिक्त सत्र न्यायाधीश एकाजुद्दीन काझी (५५) यांच्याविरोधात बुधवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने(एसीबी) गुन्हा नोंदवला. तर न्या. काझी यांच्या वतीने १५ लाखांची लाच घेणाऱ्या लिपीक चंद्रकांत वासुदेव (४०) यास अटक करण्यात आली आहे.

ह्यएसीबीह्न दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या पत्न ीच्या नावाने असलेल्या कंपनीची जागा बळकावल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने हे प्रकरण माझगाव येथील सत्र न्यायालयात सुनावणीसाठी वर्ग केले. यानंतर चंद्रकांत वासुदेव याने तक्रारदार



यांना संपर्क करून प्रत्यक्ष भेटण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी चेंबूर येथील एका कॅफेमध्ये भेट घेतली. त्यावेळी वासुदेव याने त्यांच्या बाजूने निकाल देण्यासाठी २५ लाख रुपयांची मागणी केली. १५ लाख न्यायाधीश काझी यांच्यासाठी आणि १० लाख स्वतःसाठी मागितले.

इतकी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगताच वासुदेव १५ लाख रुपये घेण्यास तयार झाला. याबाबत ह्यएसीबीह्नकडे तक्रार करण्यात आली. पडताळणीत तथ्य आढळल्याने ह्यएसीबीह्ने बुधवारी रचलेल्या सापळ्यात वासुदेव १५ लाखांची लाच स्वीकारताना अडकला. तत्पूर्वी वासुदेव याने फोनवरून काझी यांना पैसे स्वीकारल्याची माहिती दिली. त्यास न्या. काझी यांनी संमती दर्शविली. त्यामुळे काझी यांनाही या गुन्ह्यात आरोपी करण्यात आल्याचे ह्यएसीबीह्ने म्हटले आहे.

तर दुसरीकडे, कल्याण ग्रामीणचे माजी आमदार राजू पाटील यांचे बंधू आणि बांधकाम व्यावसायिक विनोद पाटील यांच्या घराची बुधवारी सकाळपासून प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली. जवळपास ११ तास त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. डोंबिवलीतील पलावा या उच्चभ्रू वसाहतीच्या विकासात लोढा यांच्यासह विनोद पाटील हेदेखील भागीदार असून याच प्रकरणात पाटील यांची चौकशी करण्यात आल्याचे सांगितले जाते.




# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## देश की जनता सुरक्षित है?

### CISF issues Nationwide High Alert! 🚨




अनंतनागमधील 'एके ४७'सह अटक केलेला डॉ. अहमद राठर आणि डॉ. अदिल यांसह अन्य जम्मू-काश्मीरमधील ५ जण; चीनमध्ये शिक्षण घेतलेला मूळचा भाग्यनगरचा कर्णावतीमधील डॉ. अहमद सय्यद, फरीदाबादमधील डॉ. शाहीन शाहिद अन् ३६० किलो बाँब बनवण्यात वापरले जाणारे अमोनियम नायट्रेट असणारा डॉ. मुजम्मिल यांची एकामागोमाग होणारी अटक आणि या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबरला देशाची राजधानी देहली येथील लाल किल्ल्यासमोर झालेला रासायनिक बाँबस्फोट यांची जुळवणी साहजिक झाली. फरीदाबादमधून तब्बल २ सहस्र ९०० किलो अमोनियम नायट्रेट आणि २ सहस्र ५६३ किलो स्फोटके अन् कर्णावतीमधूनही स्फोटक साहित्य जप्त होणे आणि अंतिमतः या सर्वांचा जैश-ए-महंमद या आतंकवादी संघटनेशी संबंध निघणे, हा सर्व 'ऑपरेशन सिंदूर'चा सूड आहे, हे ओघाने समोर येत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने जैश-ए-महंमदला लक्ष्य केले होते. डॉ. मुजम्मिल याच्या घरातील शस्त्रसाठ्यात चिनी पिस्तुले मिळाली आहेत. आतंकवाद्यांना चीनसह अन्य देशांचे साहाय्य आहे, याचा हा आणखी एक पुरावा आहे. ते 'एन्क्रिप्टेड चॅनल'द्वारे (केवळ प्राप्तकर्त्यालाच माहिती कळण्याचे माध्यम) संवाद साधत होते. अहमद सय्यद हा एरंडाच्या बियांपासून 'रासिन' नावाचे अत्यंत विषारी विष निर्माण करत होता. हे सर्व आधुनिक वैद्य समाजसेवेच्या नावाखाली काम करत होते. शस्त्रपुरवठा, निधी पुरवठा आणि जिहादी विचारसरणी पसरवणे या सर्वच गोष्टी हे पांढरपेशे आधुनिक वैद्य करत होते. 'बेरोजगारी तरुणांना आतंकवादाकडे वळवते', असे म्हणर्णाया निधर्म्यांना ही सणसणीत थोबाडीत मारल्यासारखी गोष्ट आहे. 'आपल्या आजूबाजूला असणारी धर्मांध व्यक्ती घुसखोर आहे का? तिचे वागणे संशयास्पद आहे का? याविषयी सतत जागरूक राहून पहाणे किंबहुना त्यांच्याकडे संशयाने पहाणे, हे आवश्यक का आहे?', हे आतंकवादी संघटनेच्या 'स्लिपर सेल'चे (स्थानिक साहाय्यकांचे) प्रचंड जाळे पाहिले की, लक्षात येते. भारतीय नागरिकांनीही अत्यंत सतर्क राहून सुरक्षायंत्रणांना साहाय्य करणे आवश्यक आहे; त्याविना भारतमातेच्या शरीरभर पसरलेले हे 'स्लिपर सेल'चे विष संपवणे कठीण आहे. सुदर्शन वाहिनीने 'या स्फोटाच्या अंतरापासून जवळच असलेले गौरी-शंकर मंदिर कसे सुरक्षित राहिले?', याविषयी पोस्ट प्रसारित केल्यावर अनेक देशविरोधी शक्तींनी त्यावर नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या विषारी पिलावळीला सुधारणे, हेही देशांतर्गत नागरिकरूपी सैन्याला करावे लागणार आहे. तज्ञ पोलीस आणि लष्करी अधिकारी यांच्या मते शासकीय यंत्रणा ९० टक्के घटनांमध्ये आतंकवादी घटना होण्यापूर्वीच आतंकवाद्यांचे डाव उद्ध्वस्त करत आहेत. आपल्या गुप्तचर यंत्रणांसह विविध यंत्रणांचे हे यश नाकारून चालणार नाही; परंतु आक्रमणांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने आता परत त्रुटी आणि आत्मपरीक्षण यांकडे जाण्याची वेळ येत आहे. काँग्रेस सरकारच्या काळातील भारतावरील विविध आक्रमणे आणि बाँबस्फोट यांचा विचार करता या घटनेत ज्या गतीने चक्रे फिरली अन् सर्व यंत्रणांच्या समन्वयातून ज्या गतीने मुळाकडे जाण्याचा प्रयत्न होत आहे, तो चांगलाच आहे. तंत्रज्ञानही पुढे गेले असल्याने त्याचीही साथ मिळाली; परंतु हे सर्व करतांना माध्यमांनी त्यांचे दायित्वही लक्षात घेतले पाहिजे. काही माध्यमे ते घेतही होती; परंतु या आणीबाणीच्या काळात अधिकर्यांच्या मागे लागून त्यांच्या प्रतिक्रिया घेण्याचाही भाग होत होता; ज्या वेळी पीडितांचे जीव वाचवणे त्यांचे प्राधान्य होते. अशा प्रकारचे मोठे आक्रमण देशावर होते, तेव्हा एकाच वेळी अनेक आघाड्यांवर आणि तेही तातडीने अन् तेवढेच विचारपूर्वक काम चालू करावे लागते. त्यात पीडितांना रुग्णालयात पाठवणे, पुरावे गोळा करर्णाया विविध यंत्रणा कार्यरत करणे, त्यासाठी परिसर बंद करणे, अग्नीशमन यंत्रणा चालू करणे, प्रत्यक्षदर्शी पुरावे गोळा करणे, त्याच वेळी विविध ठिकाणी गस्त वाढवणे, सीसीटीव्ही पडताळणे, जे पुरावे मिळत आहेत, त्यांच्या मागेमागे जाऊन मुळाशी जाण्याच्या कृती कार्यान्वित करणे, त्यामध्ये विविध यंत्रणांचा योग्य समन्वय साधणे, माध्यमे आणि नागरिक यांना दिलासा देणे, अन्य कुठे अशा प्रकारे आक्रमणाची शक्यता नाही ना? ते पडताळणे, अशा एका ना अनेक गोष्टी या अंतर्गत येतात. या साऱ्याच गोष्टी या घटनेच्या २ घंट्यांत कार्यान्वित झाल्याने त्याची फलनिष्पत्तीही चांगली मिळत गेली. विशेष म्हणजे गृहमंत्री अमित शहा स्वतः काही वेळात तातडीने घटनास्थळी आल्याने 'शासनाने ही गोष्ट अत्यंत गांभीर्याने घेतली आहे', याची निश्चिती जनतेला झाली. ह्यशासन अपराध्यांना शिक्षा करीलह्ण, हा विश्वास जनतेला वाटणे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. मोदी शासनाने आतापर्यंत आतंकवाद्यांचा घेतलेला प्रतिशोध पहाता या घटनेनंतरही शासन काही ना काही प्रतिशोध नक्की घेईल, याची निश्चिती जनतेला आहे; परंतु 'आता हा मारामारीचा खेळ किती दिवस चालू ठेवायचा आहे?', हा प्रश्नही सूज्ञ आणि देशप्रेमी जनतेला पडला आहे. जिहाद्यांच्या प्रत्येक आक्रमणात काहींचे मृत्यू झाल्यावर त्यांना त्याच्या दुप्पट-तिप्पट शिक्षा द्यायची; परत काही दिवसांनी त्यांनी वेगळ्या स्वरूपाचे आक्रमण करण्याचे धाडस करायचे, असेच चालू आहे. गुरुदासपूर, पठाणकोट, उरी, जम्मूतील सैन्य छावणी, अमरनाथ, पुलवामा आणि आता देहली, ही आक्रमणांची मालिका काही संपण्याचे नाव घेत नाही. ज्या ध्येयाने सरकारने नक्षलवाद संपवण्याच्या स्थितीत आणून ठेवला आहे, त्याच ध्येयाने आता भारतातील अंतर्बाह्य आतंकवादी आक्रमणे संपूर्णपणे संपवण्याचा पण केला पाहिजे; नाहीतर 'झिरो टॉलरन्स' (शून्य सहनशक्ती), 'देश की जनता सुरक्षित है' (देशाची जनता सुरक्षित आहे) या सगळ्या वल्गना ठरू शकतात. भारत सर्व दृष्टीने अधिकाधिक सक्षम होत असतांना आणि दुसरीकडे पाक अधिकाधिक भिकेकंगाल होत असतांना अशा प्रकारचे आक्रमण होणे, हे खेदजनक आहे. यापुढेही अधिक तीव्रतेने सूड घेतला, तरी पाकरूपी श्वानाचे शेपूट कधीही सरळ होऊ शकत नाही. आता कायमस्वरूपी पयार्यांचा वापर करण्याकडेच भारताने पावले उचलली पाहिजेत, असे तज्ज्ञांसमवेत सामान्य नागरिकांनाही वाटते. किती दिवस ही आतंकवादी आक्रमणे सहन करायची? आणि किती दिवस 'स्ट्राईक' अन् 'ऑपरेशन' करत रहायचे? आतार्यंत आपण सहस्रो सैनिक आणि लक्षावधी नागरिक यांना या जिहाद्यांमुळे गमावले आहे. आता केंद्र सरकारने या संधीचा लाभ घेऊन पाकचे कंबरडे पुरते मोडावे. भारताच्या डोक्यावर बसलेले हे पाप नष्ट झाल्याविना भारताला शांती मिळणार नाही. 'हिंदु राष्ट्र' या एका नावात हे पापस्तान नष्ट करण्याची सूक्ष्म क्षमता आहे, हे मात्र निश्चित!

## इस्त्रायलकडून धडा घ्या!




'राजधानी देहलीत झालेल्या बाँबस्फोटाचा संबंध तूर्तास पाकशी थेट जोडला गेलेला नाही, तरी देशप्रेमी जनता पाकविरोधात 'ऑपरेशन सिंदूर २.०'चालू करा', अशा मागण्या करत आहे. तथापि भारतात जिहादी आतंकवाद फोफावण्यामागे त्याचा पुरस्कर्ता पाकिस्तानच राहिला आहे. वर्ष २००१ चे संसदेवरील आक्रमण, मुंबईतील २६/११ चे आक्रमण, वर्ष २०१६ मध्ये पठाणकोट आणि उरी येथे झालेली आक्रमणे, पुलवामा येथील आक्रमण किंवा ६ महिन्यांपूर्वी झालेले पहलगाम येथील आक्रमण अशा असंख्य आक्रमणांमागे पाकचा हात असल्याचे निष्पन्न झाले. एवढे सगळे होऊनही 'खऱ्या भारतियांना, म्हणजे हिंदूंना शत्रूबोध झालेला नाही', ही खेदाने सांगण्यासारखी गोष्ट आहे. याचा मागोवा आतातरी घेतला पाहिजे, अन्यथा पाकपुरस्कृत जिहादी आतंकवाद, पाकपुरस्कृत खलिस्तानवाद, साम्यवाद, चीन, अमेरिकेची 'डीप स्टेट' आदींची दुष्ट आघाडी भारताचे नि हिंदूंचे लचके तोडण्यात यशस्वी होईल.

पाकला सीमेपलीकडून भारतात आतंकवादाचे जाळे निर्माण करणे अशक्य आहे. यासाठी तो प्रशिक्षित आतंकवाद्यांना भारतात पाठवण्यासह त्यांच्या साहाय्यासाठी देशातील देशद्रोही मुसलमानांना हाताशी धरतो, हे उघड सत्य आहे. याला सोप्या भाषेत 'स्लिपर सेल' म्हणतात. या जोडीला पाक उच्चशिक्षित भारतीय मुसलमानांनाही त्याच्या कारवायांमध्ये जोडतो. याचा अर्थ आतंकवादी कारवायांचे 'मास्टरमाईंड' (मुख्य सूत्रधार) पाकमध्ये बसून या उच्चविद्याविभूषित भारतियांकडून कारवाया घडवून आणतात. लाल किल्ल्याजवळील आक्रमणामागे असलेले ५ भारतीय डॉक्टर हे याचे पहिले उदाहरण नाही. गेल्या काही वर्षांमध्ये अशा अनेक उच्चशिक्षित मुसलमानांनी आतंकवादी आक्रमणे घडवली अथवा भारतात जिहादी विचारसरणीचा विखारी प्रचार केला. 'इंडियन मुजाहिदीन'चा ('आयएम्'चा) सहसंस्थापक अब्दुल सुभान कुरेशी हा सॉफ्टवेअर अभियंता आहे. याला भारताचा 'ओसामा बिन लादेन' म्हटले जाते. महंमद मनसूर अझगर हा संगणक अभियंता 'आयएम्'चा प्रसारमाध्यम गट सांभाळायचा. रियाज भटकळ, झबिउद्दिन अन्सारी, अरीब मजीद, महदी मसरूर बिस्वास असे असंख्य उच्चशिक्षित अभियंते आणि भारतीय नागरिक हे कुख्यात नि विद्याधारित आतंकवादी आहेत.

'जिहाद' (इस्लामसाठी मुसलमानेतरांच्या विरोधात पुकारलेला लढा), 'शिर्क' (अल्लाह सोडून जगातील अन्य कोणतीही गोष्ट पूज्य नसणे), ह्यहिंदू, म्हणजेच मूर्तीपूजक हे 'ताव्हिद'ला (इस्लामी एकेश्वरवादाला) थेट आव्हान देतात', 'किताल फी सबिलिल्लाह', म्हणजेच 'उम्माह'च्या (मुसलमान समाजाच्या) संरक्षणासाठी, तसेच अल्लासाठी लढा देणे', या गोष्टी तशाही सर्वच मुसलमानांना मदरशांमध्ये शिकवल्या जातात. त्यात अल्लासाठी करण्यात येर्णाया युद्धाला आधुनिक विज्ञानाची साथ मिळवण्यासाठी अल्लाशी निष्ठा असणारे अभियंते आणि डॉक्टर यांचा हात धरला जातो. भारतियांच्या करातून डॉक्टर बनलेले अदिल, मुजम्मिल, शाहीन, उमर हे या शिकवणीतूनच जिहाद करण्यास सिद्ध होतात आणि त्यासाठी ३ सहस्र २०० किलो अमोनियम नायट्रेट एकत्र करतात. या डॉक्टरांसाठी 'रुग्णसेवा ही ईशसेवा' नसून 'जग इस्लाममय व्हावे' ('दारुल इस्लाम' व्हावे), यासाठी हे सेवारत रहातात. त्यांच्यासाठी धमार्साठी चालू असलेले हे अमर्यादित युद्ध आहे आणि ते लढणे हे धर्मकर्तव्य ! गेली १ सहस्र ४०० वर्षे जो नरसंहार घडवण्यात आला, तो याच विचारसरणीने प्रेरित राहिला. झोपलेला भोळसट हिंदु समाज केवळ एका निवडणुकीपुरता एकत्र येतो. त्याला त्यातच स्वतःचे हित दिसत असते. हिंदूंच्या या मर्यादित युद्धाच्या तुलनेत मुसलमानांचे युद्ध अमर्याद आहे. थोडक्यात हिंदूंना शत्रूबोध नाही आणि तो अशा प्रकारे झोपून राहिला, तर त्याचे समूळ उच्चाटन होणार, हेच त्रिकालाबाधित सत्य आहे.

हिंदुहित रक्षणासाठी भारत सरकार आणि प्रशासन यांचे धोरण नि भूमिकासुद्धा तेवढीच महत्त्वपूर्ण आहे. यासंदर्भात प्रसिद्ध वक्ते, वैज्ञानिक आणि लेखक आनंद रंगनाथन् सांगतात, ह्यभारतीय व्यवस्थेने ३ वास्तव स्वीकारून त्यांच्यावर प्रभावी उपाययोजना काढली पाहिजे. एक म्हणजे 'रॅडिकल इस्लाम', याचाच अर्थ 'इस्लामी कट्टरतावाद' नावाचा प्रकार अस्तित्वात नाही. याचे कारण त्यांची विचारसरणीच कट्टर आहे. प्रत्येक वेळी जिहाद्यांनी आक्रमणे घडवून आणली की, अन्य मुसलमान 'धार्मिक पुस्तकातील शिकवणीच्या अथार्चा अनर्थ केला गेला', 'चुकीच्या प्रकारे संदर्भ लावला आणि त्या भावनेतून आक्रमण केले', अशी नानाविध स्पष्टीकरणे देतात. 'श्रद्धावान मुसलमानां'ना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु तसे नाही आणि हे भारत सरकारने स्वीकारले पाहिजे. दुसरे म्हणजे 'आतंकवादाला धर्म आहे.' पहलगाम आतंकवादी आक्रमण सर्वश्रुत आहे. तिसरे म्हणजे वेगवेगळे कायदे समाजाचे एकत्रीकरण करत नाहीत, तर दुही माजवतात. आपण वर्चस्ववादी मुसलमानांसाठी एक कायदा आणि हिंदूंसाठी वेगळा कायदा केला, तर याने एकोपा नाही, तर अपरिवर्तनीय हानीच होणार आहे.' त्यामुळे जोपर्यंत आपण या ३ वास्तवांचा सामना करून त्यावर काही करणार नाही, तोपर्यंत सर्व काही पोकळ वल्गना आणि वरवरचे उपायच ठरणार आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

डॉ. आंबेडकर यांनी सांगितले होते, 'इस्लाम हा स्थानिक सरकारविसंगत आहे. याचे कारण मुसलमानाची निष्ठा ही तो रहात असलेल्या देशाशी नाही, तर त्याच्या धार्मिक श्रद्धेशी आहे.' त्यामुळे आपण हे सत्य स्वीकारणे, ही काळाची आवश्यकता आहे. यामुळे यापुढे जे नागरिक आतंकवाद्यांच्या दफनविधीला जातील, त्यांना संभाव्य आतंकवादी म्हणूनच पाहिले गेले पाहिजे. जे राजकीय पक्ष मुसलमानांचे लांगूलचालन करतील, त्यांना देशद्रोही ठरवून त्यांच्यावर कारवाई केली जावी. जे लोक 'आतंकवादाला धर्म नसतो', असे म्हणतील, त्यांना आतंकवादी संबोधून त्यांच्यावर कारवाई केली जावी. आज या पैशाचिक मानसिकतेशी केवळ इस्रायल ताठ मानेने लढत आहे. संपूर्ण जग त्याच्या विरोधात असले, तरी तो हमासचे समूळ उच्चाटन करण्यासाठी काहीही करण्यास सिद्ध आहे. चहूबाजूंनी इस्लामी राष्ट्रे, आतंकवादी संघटना आदींनी त्याच्या विरोधात युद्ध पुकारले आहे; परंतु इस्रायल हा रंगनाथन् यांनी मांडलेले ३ वास्तव जाणतो आणि त्याचा प्रतिकार करतो. त्याला तात्कालिक नाही, तर त्याला कायमस्वरूपी विकास हवा आहे. यामुळे 'शांती'चा संदेश देणारे नेतान्याहू आहेत, अन्य कुणीही नाही, हे लक्षात घ्या आणि आतातरी शत्रूबोध करून घेऊन दंड थोपटा!

## या बिबट्यांची जीवघेणी घुसखोरी रोखण्याचे आव्हान!

> आजघडीला मनुष्यवस्तीच्या 2 ते 5 किमी परिसरात बिबट्यांचं अस्तित्व जाणवू लागलंय. अगदी मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरी भागातसुद्धा बिबट्यांची घुसखोरी वाढू लागलीय. खरं तर नव्या पिढीतल्या बिबट्यांनाही आता जंगलाचा विसर पडलाय की काय असा प्रश्न निर्माण व्हावा. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात जिथं वाघ, बिबटे व इतर हिंस्र प्राण्यांच्या अधिवासाजवळ लोकवस्त्या वाढत असताना या संघषार्ची तीव्रता अधिक जाणवते. प्रशासन, वनविभागाच्या नियोजनबद्ध उपाययोजनांनी आणि प्रभावी अंमलबजावणीने हा संघर्ष कमी करता येईल.



मागच्या काही दिवसांमध्ये पुणे, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात मनुष्य-बिबट्यांमधील संघर्ष कमालीचा उफाळून आलाय. त्यामुळं कधी नव्हे तो राज्यातील वन विभाग चर्चेत आलाय. अगदी परवाच कोल्हापूरकरांना बिबट्यानं चांगलंच वेठीला धरलं होतं. सोमवारी रात्री एक बिबट्या विवेकानंद कॉलेज परिसरात दिसल्यानं स्थानिकांची भीतीनं गाळण उडाली होती. हाच बिबट्या मेरी व्हेदर ग्राऊंड परिसरात दिसल्याचं काही वाहनचालकांनी सांगितलं होतं. सकाळ होते न होते तोच बिबट्या शहराच्या मुख्य वस्तीत डरकाळ्या फोडत दाखल झाला आणि सगळ्यांची पाचावर धारण बसली... बिबट्याची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारीही लगबगीनं शहरात दाखल झाले. जागोजागी सापळा लावून बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न करत असताना प्रत्येक वेळेला हा बिबट्या वन विभागाच्या कर्मर्चायांना हुलकावणी देऊन अलगद निसटत होता. सकाळी मुख्य रस्त्याला लागून असलेल्या एका बंगल्यातून बिबट्यानं हॉटेल वूडलँडच्या गार्डनमध्ये उडी घेत तिथं काम करत असलेल्या एका कर्मर्चायावर हल्ला चढवला. या कर्मर्चायाला जखमी करून आधी बीएसएनएल कार्यालय आणि नंतर महावितरण कार्यालयातील एका चेंबरमध्ये तो लपून बसला. परंतु, वन विभागाचे कर्मचारी आणि पोलिसांनी अत्यंत संयम व कौशल्य दाखवत सुमारे २ तासांच्या अथक प्रयत्नांनी बिबट्याला गुंगीचं इंजेक्शन देऊन जेरबंद केलं आणि कोल्हापूरकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या बिबट्याला पकडून सुरक्षित ठिकाणी नेण्यात आलं असून तो नजीकच्या जंगलातून अन्नाच्या शोधात शहरात आला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येतोय.

तर, गेल्या आठवड्यात पुण्याच्या शिरूरमध्ये अगदी याचप्रकारे हैदोस घालर्णाया एका नरभक्षक बिबट्याला गोळ्या घालून ठार मारण्याची वेळ वन विभागावर ओढावली होती. या बिबट्यानं २ ऑक्टोबर रोजी ५ वर्षीय शिवन्या बोंबे, २२ ऑक्टोबर रोजी ८२ वर्षीय भागुबाई जाधव आणि १ नोव्हेंबरला १३ वर्षीय रोहन बोंबे या तिघांना भक्ष्य बनवलं होतं. एकाच महिन्यात तीन जणांचा बळी घेर्णाया या बिबट्याच्या हल्ल्यामुळं ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीती आणि संताप निर्माण झाला होता. या बिबट्याला जेरबंद करण्याच्या मागणीसाठी आक्रमक गावकर्यांनी वनविभागाची गाडी आणि कार्यालय पेटवून दिलं होतं. एवढंच नाही, तर १५ ते १६ तास रास्ता रोको करून पुणे-नाशिक महामार्गही ठप्प केला होता. अखेर ग्रामस्थांनी आपलं आंदोलन मागं घेतलं, ते नरभक्षक बिबट्याला दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे वन विभागाचे आदेश मिळाल्यानंतरच. वन विभागाच्या शार्प शूटर्सनी रोहनवर हल्ला केला, त्याच ठिकाणापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर बिबट्याचा गोळ्या घालून खात्मा केला. ठार झालेला बिबट्या हाच तीन वेगवेगळ्या हल्ल्यांमधला नरभक्षक असल्याचं ठसे आणि डीएनए नमुन्यांवरून सिद्ध झालं. ह्यखून का बदला खूनह्णनं घेतला गेला. मनुष्य-बिबट्यांमधील या संघर्षात नुकसान दोन्ही बाजूचं झालं.


पुणे जिल्ह्यातील जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि खेड तालुक्यांमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांमुळं दहशतीसोबत स्थानिकांमधील रोषही वाढू लागलाय. कारण इथं बिबट्यानं मागच्या काही वर्षांमध्ये 55 हून अधिक जणांचे बळी घेतलेत. अहिल्यानगरमध्येही बिबट्याच्या हल्ल्यात बळी गेलेल्यांची संख्या खूप आहे. मध्यंतरी वन विभागाच्या एका अधिकर्यानं नाव न छापण्याच्या अटीवर एक धक्कादायक माहिती दिली होती. एकट्या जुन्नर विभागात आशियातले सगळ्यात जास्त बिबटे असल्याचा दावा त्यानं केला होता. त्यात सुमारे १ हजार प्रौढ बिबटे आणि ३०० ते ४०० बछडे असल्याचं त्यानं सांगितलं होतं. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात अंदाजे १,३०० बिबटे असल्याचं मान्य केलं होतं. बिबट प्रवण क्षेत्र असलेल्या शिरूर व आंबेगाव तालुक्यांत गेल्या महिनाभरात आतापर्यंत १७ बिबटे पकडण्यात आले असून, हे सर्व बिबटे जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारण केंद्रात ठेवण्यात आले आहेत. याच तर्हेनं पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील बिबट्यांची संख्या झपाट्यानं वाढल्यामुळं बिबट्यांचं हे संकट काही जिल्ह्यांपुरतं मर्यादित न राहता अख्ख्या महाराष्ट्रभर पसरत असल्याचं मुख्य वन्यजीवप्रमुख एम.श्रीनिवास रेड्डी यांनीही मान्य केलंय.

एकीकडं बिबट्यांची पैदास वेगानं वाढत असताना त्यांचं स्थलांतर आणि नसबंदी असे उपाय वेळीच न केल्याचे परिणाम आज स्थानिकांना भोगावे लागत आहेत. परंतु मनुष्य-बिबट्या संघषार्च हेच एकमेव कारण नाहीय. खरी समस्या तुकड्या तुकड्या विभागून जंगलांचं क्षेत्र कमी होण्यापासून सुरू झालीय. यातूनच वन्यजीवांचे असंख्य पुरातन मार्ग बाधित झालेत किंवा नष्ट झालेत. नागरी वस्त्यांचा विस्तार होत होत जंगलापर्यंत घुसलाय, रस्ते-महामार्गासाठी जगलं उभी-आडवी कापण्यात आलीय. खाण क्षेत्रं, पर्यटन प्रकल्पांमुळं बिबट्यांच्या अधिवासावर अतिक्रमण वाढत आहे. जंगलक्षेत्र कमी झाल्यानं नाईलाजानं बिबट्यांना जंगलानजीकच्या शेतजमिनी, महामार्गालगतची झाडीझुडूपं आणि अगदी गावकुसाबाहेर आश्रय घेण्यास भाग पाडलं जातंय. तिथं त्यांना शेळ्या-मेंढ्या, गायी-म्हशी, पाळीव कुत्री, मांजरं आणि कोंबड्यांची आयती खुराक मिळू लागताच तीही जंगलाकडं परत न जाता तिथंच विसावू लागलीय. जंगलाच्या कडेला मानवी वस्त्यांनी केलेल्या प्रचंड घाणीवर कुत्री-मांजरं पोसली जातात हे आयतं भक्ष्य बिबट्यांना आकर्षित करतं.

पश्चिम महाराष्ट्रात उसाच्या लागवडीचं क्षेत्र विस्तारत चाललंय, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातही हाच ट्रेंड फॉलो केला जातोय. जंगलानजीकच्या उसाच्या फडात बिबट्यांना लपण्यास सोयीची जागा मिळते. तिथंच मादी बिबट्या पिलांना जन्माला घालते आणि बछडेही या फडात उसाच्या पिकासोबत वाढू लागतात. जुन्नर भागात ९०० हून अधिक बिबटा मादी असल्याचा अंदाज आहे. मात्र, जेव्हा उसाच्या काढणीची वेळ येते तेव्हा बिबट्याच्या नव्या अधिवासाला नवा धोका तयार होतो आणि हे बिबटे सैरावैरा पळू लागतात. इतर वेळी रात्री किंवा पहाटे दबा धरून हल्ला करणारे बिबटे गोंधळून आणखीनच आक्रमक होतात. रात्रीच्या वेळी सामसूम रस्त्यावर फिरणारे बिबटे उसाचे ट्रक कारखान्यात जाऊ लागताच दिवसाढवळ्या मुख्य रस्त्यावरून फिरू लागतात. पाळीव प्राण्यांसह लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांना ते भक्ष्य बनवू लागतात. आजघडीला मनुष्यवस्तीच्या २ ते ५ किमी परिसरात बिबट्याचं अस्तित्व जाणवू लागलंय, अगदी मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरी भागातसुद्धा बिबट्यांची घुसखोरी वाढू लागलीय. खरं तर नव्या पिढीतल्या बिबट्यांनाही आता जंगलाचा विसर पडलाय की काय असा प्रश्न निर्माण व्हावा. पण काहीही केलं तरी एका म्यानात जशा दोन तलवारी राहू शकत नाही तसंच मनुष्य आणि बिबटेही एकाच ठिकाणी राहू शकत नाहीत. त्यामुळंच एकमेकांच्या अधिवासातील शिरकाव अधिकच चिंताजनक बनला आहे.

प्रशासन आणि वन विभाग स्थानिकांना सुरक्षा पुरवण्यात कमी पडत असल्यानं पिंपळखेडचे काही ग्रामस्थ, शेतर्कयांनी स्वतःचं संरक्षण करण्यासाठी अनोख्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. काही शेतकरी, महिलांनी तर थेट गळ्यामध्ये टोकदार खिळ्यांचा पट्टा घालून शेतात काम करण्यास सुरुवात केलीय. काहीही केलं तरी शेती हेच गावर्कयांच्या उपजीविकेचं मुख्य साधन असल्यानं त्यांना शेतात काम करण्याशिवाय पर्याय नाही. दिवसा शेतात काम करताना कुठूनही बिबट्या हल्ला करू शकतो. बिबट्या हा प्रामुख्यानं मान आणि घोटावर हल्ला करतो. अशा परिस्थितीत, कुत्र्यांच्या गळ्यात खिळ्यांचे पट्टे घालण्याच्या तंत्राचा वापर करून शेतर्कयांनी विशेषतः महिलांनी स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी अनोखा मार्ग अवलंबलाय. प्रशासनानंही उशिरा जाग येऊन का होईना या भागात २०० पिंजरे आणि एआयवर आधारित कॅमेंयांची सोय केलीय. सोबतच बिबट निवारा केंद्रातील ५० बिबट्यांना जामनगरच्या वनतारात नेण्याच्या प्रस्तावावरही चर्चा सुरू असून इतर बिबट्यांना पकडून देशातल्या इतर भागात, आफ्रिकेत नेण्यावरही विचार सुरू झाल्याचं समजतं. बिबट्या हा देखील वाघासारखाच मार्जार कुळातला प्राणी आहे. वाघ आपल्या अधिवासात कुणालाही शिरकाव करू देत नाही, वाघाचं क्षेत्रही मोठं असतं. बिबट्याच्या अधिवासाचं क्षेत्र कमी असलं, तर कमी जागेत मोठ्या संख्येने बिबटे राहतात आणि एकानं स्थलांतर केल्यावर त्याची जागा दुसरा बिबट्या भरून काढतो. बिबट्या दिसताक्षणीच त्याला मारा असं गावकरी कितीही म्हणत असले, तरी वन्य जीव संरक्षण कायद्या (१९७२) नुसार तसं करता येत नाही.

एखादा प्राणी नरभक्षक असल्याचं सिद्ध झाल्याशिवाय त्याला गोळ्या घालता येत नाहीत, त्यातही तो नेमका त्याच्या क्षेत्रात आहे की मानवी वस्तीत आहे, असे असंख्य निकष तपासून घ्यावे लागतात. त्याला कायमचं जेरबंद करण्याचाही पर्याय असतो. पिंपळखेड या गावातील स्थिती गंभीर झाल्यानं फक्त त्या नरभक्षक बिबट्याला बेशुद्ध करून पकडा अथवा शेवटी मारा, असे आदेश द्यावे लागले; मात्र हे आदेश अपवादात्मक स्थितीमुळं दिले होते. त्यामुळं सध्यातरी बिबट्याचं आक्रमण थोपवण्यासाठी स्थलांतर, नसबंदी हेच उपाय प्रामुख्यानं समोर येतात. भारतासारख्या जैवविविधतेने समृद्ध असलेल्या देशात मानव आणि वन्यजीव यांच्यातील संबंध नेहमीच नाजूक राहिले आहेत. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात जिथं वाघ, बिबटे व इतर हिंस्र प्राण्यांच्या अधिवासाजवळ लोकवस्त्या वाढत असताना या संघषार्ची तीव्रता अधिक जाणवते. प्रशासन, वन विभागाच्या नियोजनबद्ध उपाययोजनांनी आणि प्रभावी अंमलबजावणीने हा संघर्ष कमी करता येईल. शेवटी वन्यजीव वाचले तरच जंगल वाचेल आणि जंगल वाचलं तरच पर्यावरणाचं संतुलन आणि भावी पिढ्यांचं भवितव्य सुरक्षित राहील.



# छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्‌सची समस्या!

**चेर्हयावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्‌सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेर्हयाला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करर्णाया बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेर्हयावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?**

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

# महत्त्वाचा कानमंत्र

• बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.

• तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत.



यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.


• फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.

• सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.

• केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.

• केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

# रंगाला अनुसरून करा मेकअप



**गोऱ्या रंगासाठी :**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.



**गडद रंगाच्या त्वचेसाठी :**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरॅमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.



**पिवळ्या रंगाची त्वचा :**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यूऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

**गव्हाळ त्वचेसाठी :**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

# डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण होतो.

**काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे -**

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

**डेंग्यू आघाताचे सिंड्रोम-**

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता जाणवते



# खाल्ल्या मिठाचे परिणाम

**खाल्ल्या** मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर असते.



मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.

# व्यायामाचेही व्यसन नको

**शरीर** तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.



एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते. परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

# उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

**आपण** अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...



**पचनाचे विकार -**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वारंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

**किडनीचे विकार -**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

**सांधेदुखी -**

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

# कर्जत-कसारा मार्गावरील प्रवाशांना लवकरच दिलासा

## कार्यरत असलेल्या १२ डब्यांच्या काही लोकलचे रूपांतर १५ डब्यांमध्ये केले जाईल



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

कर्जत, कसारा मार्गावरील प्रवाशांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे. कर्जत, कसारा स्थानकांदरम्यान १५ डब्यांची लोकल चालविण्यासाठी २७ रेल्वे स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून ही कामे डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य मध्य रेल्वे प्रशासनाने ठेवले आहे. सध्या सीएसएमटी ते डोंबिवली, कल्याण दरम्यान १५ डब्यांच्या लोकल फेऱ्या धावतात. तर काही लोकल १२ डब्यांच्या चालतात. या लोकल गर्दीने ओसंडून धावतात. प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने लोकल सेवेवर प्रचंड ताण येत आहे. त्यामुळे या मार्गावर १५ डबा लोकल फेऱ्या वाढविण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. सध्या सीएसएमटी ते कल्याणदरम्यान १५ डबा लोकलच्या सुमारे २२ फेऱ्या चालतात. तर कल्याण-कसारा, कल्याण-खोपोली दरम्यानच्या स्थानकांच्या फलाटाची लांबी कमी असल्याने १५ डब्बा लोकल चालविण्यात अडथळा येत आहे. मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगरातील ३४ स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. यापैकी २७ स्थानकांचे विस्तारीकरण डिसेंबरअखेरीस पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. माहितीनुसार, २७ पैकी सर्वाधिक स्थानके कल्याण- कर्जत-खोपोली आणि कल्याण- कसारा या मार्गावरील आहेत. सुरुवातीला, सध्या कार्यरत असलेल्या १२ डब्यांच्या काही लोकलचे रूपांतर १५ डब्यांमध्ये केले जाईल आणि नंतर टप्प्याटप्प्याने संख्या वाढवली जाईल.

### सीएसएमटी स्थानकात आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हा



मुंब्रा दुर्घटनेला जबाबदार असलेल्या दोन अभियंत्यांवर दाखल केलेला गुन्हा मागे घ्यावा यासाठी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या (सीआरएमएस) कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे गेल्या आठवड्यात आंदोलन केले. यामुळे लोकल सेवा तब्बल एक तास विस्कळीत झाली. या प्रकरणी सीएसएमटी पोलिसांनी रात्री आंदोलकांवर गुन्हा दाखल केला.

जून महिन्यात मुंब्रा येथे झालेल्या दुर्घटनेत पाच प्रवाशांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय अभियंता समर यादव आणि सहाय्यक विभागीय अभियंता विशाल डोळस यांच्याविरोधात ठाणे रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हे गुन्हे मागे घेण्यासाठी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने गुरुवारी सीएसएमटी स्थानकात आंदोलन केले. यामुळे सुमारे एक तास लोकल सेवा ठप्प झाली होती.

संघटनेला डीआरएम कार्यालयासमोर आंदोलन करण्यास परवानगी असताना सीआरएमएसचे पदाधिकारी व सदस्य जमाव मिलन हॉल येथे जमा झाले. जमावामध्ये सीआरएमएस संघटनेचे प्रमुख प्रविण वाजपेयी व त्यांच्या सोबत इतर १०० ते २०० आंदोलक हे सामील होते. आंदोलक डीआरएम कार्यालयासमोर गेले व तेथे रेल्वे पोलीस ठाणे, लोहमार्ग मुंबई यांच्याकडून करण्यात आलेल्या कायदेशीर कारवाईचा निषेध करून घोषणाबाजी केली. आंदोलन समाप्त झाल्यानंतर सीआरएमएस संघटनेचे सदस्य एस. के. दुबे आणि विवेक शिसोदीया व त्यांच्यासोबत इतर ३० ते ४० आंदोलक हे सीएसएमटी लोकल लाईन जनरल हॉल येथील मोटरमन लॉबी येथे आले.

# दहिसर टोल नाका आता २० मीटर पुढे

## वाहतूक सुरळीत झाल्याचा प्रताप सरनाईक यांचा दावा




■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील वाहनचालकांना आश्चर्याचा धक्का देत दहिसर टोल नाका २० मीटर पुढे हलवण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याला वाहतूककोंडी कमी करण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल म्हटले असले, तरी रोजच्या प्रवासात अडकणाऱ्या नागरिकांमध्ये या किरकोळ बदलामुळे नाराजी आणि संताप पसरला आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात बदलाची अपेक्षा होती.

गेल्या काही महिन्यांपासून सरनाईक नागरिकांना आश्वासन देत होते की, दहिसर टोल नाका हलवून मुंबईच्या उत्तरेकडील प्रवेशद्वारावरील प्रचंड कोंडी कमी केली जाईल. यासाठी त्यांनी एमएसआरडीसी आणि एनएचएआयला वसोर्वा पुलाजवळ नवीन ठिकाणांचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले होते. मात्र महामार्गालगतच्या गावकऱ्यांनी टोल नाका वसई-विरार किंवा मीरा-भाईंदर हद्दीत हलवण्यास तीव्र विरोध केला.

# तरुणांच्या विवाह योगात बिबट्यांचे विघ्न

## दहशतीमुळे पुणे जिल्ह्यात विवाहेच्छुक तरुणांना मुली मिळेनात



**सुरक्षेसाठी गावकऱ्यांकडून विविध उपाययोजना**

दिवसाढवळ्या बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतात काम करताना बिबट्यापासून संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना गावकरी करत आहेत. बिबट्या नरडीचा घोट घेत असल्याने काही गावांतील महिला सुरक्षेचा उपाय म्हणून गळ्यात खिळे असलेला पट्टा धारण करीत आहेत. सध्या बिबट्याची दहशत केवळ जीवघेणीच ठरत नाही, तर विवाहांमध्येही बाधा येऊ लागल्याने नवी सामाजिक समस्याही निर्माण झालेली दिसत आहे.

■पुणे। प्रतिनिधी,

राज्याच्या विविध भागात सध्या बिबट्यांची दहशत सुरू आहे. या बिबट्यांमुळे अनेकांच्या प्राणावर बेतले जात आहे. त्यातच आता बिबट्यांमुळे तरुणांच्या विवाह योगातही विघ्न येऊ लागले आहे. बिबट्याची दहशत असलेल्या गावांमध्ये मुली देण्यास मुलींचे पालक नकार देत आहेत. त्यामुळे शेकडो विवाहेच्छुक तरुणांची लग्ने रखडली आहेत.

उत्तर पुणे जिल्ह्यातील अनेक गावात सध्या बिबट्याची दहशत पसरली आहे. बिबट्या अचानक येऊन प्राण्यांसह माणसांवर हल्ले करत आहेत. त्यामुळे गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्या कधीही येऊन आपला फडशा पाडेल, अशी घबराट गावकऱ्यांमध्ये आहे. माणसांच्या रक्ताला चटावलेला बिबट्या लग्नातही मोठा अडथळा ठरत आहे. बिबट्याच्या दहशतीखाली वावरत असलेल्या शिरूर तालुक्यामधील गावांत एकाही मुलाची सोयरिक जमेनाशी झाली आहे. लग्नासाठी मुली न मिळाल्याने गावांतील अनेक तरुण हवालदिल झाले आहेत. बिबट्याच्या भीतीमुळे कोणतेच पालक या गावात आपल्या मुली द्यायला तयार नाहीत. त्यामुळे अनेकांची लग्न रखडली आहेत.

मुले चांगल्या घरातील असूनही त्यांना लग्नासाठी होकार मिळत नाही, अशी सध्या स्थिती आहे. गावात आणि आसपासच्या भागात बिबट्याची दहशत असल्यामुळे कोणतेच पालक या गावांमधील तरूणांशी आपल्या मुलीचे नाते जोडण्यास तयार नाहीत. मुलीही या गावांत येण्यास आणि जीव धोक्यात घालण्यास नकार देत आहेत. बिबट्यांच्या धाकाने गावांतील सामाजिक वातावरणही ढवळून निघाले आहे. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे विवाहसंबंधांवर परिणाम होणे हे ग्रामीण भागातील नवे आणि चिंताजनक वास्तव ठरत असून बिबट्यांचा लवकरच बंदोबस्त करून लग्न जुळण्यातील अडथळे दूर करावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, शिरूर, जुन्नर, खेड या तालुक्यांत बिबट्यांमुळे भयावह परिस्थिती तयार झाली आहे. लोकांच्या, जनावरांच्या रक्ताला चटावलेला बिबट्या कधी भरवस्तीत घुसून तर कधी शेतातील लोकांना पकडून, कधी गोठ्यातील गुरांचे नरडे पकडून त्यांना ठार मारून घेऊन जातो. त्यामुळे गावकऱ्यांना जीव मुठीत धरून जगायची वेळ आली आहे.

### सावंतवाडीत उभे राहणार कोकणातले पहिले 'सैनिक स्कूल'

# 'भोसले सैनिक स्कूल'ला केंद्र सरकारची अधिकृत मान्यता

■सावंतवाडी। प्रतिनिधी,

श्री यशवंतराव भोसले एज्युकेशन सोसायटी संचलित भोसले सैनिक स्कूलला नुकतीच अधिकृत मान्यता मिळाली असून सावंतवाडी शहरात ही सैनिक शाळा उभारण्यात येणार आहे. संरक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि नवी दिल्लीतील सैनिक स्कूल सोसायटीच्या माध्यमातून मिळालेल्या या मान्यतेमुळे कोकणातील हे पहिले सैनिक स्कूल ठरणार आहे. शहरातील चराठे येथील भोसले नॉलेज सिटीच्या भव्य संकुलात येत्या




१५ नोव्हेंबर रोजी या शाळेचे उद्घाटन तसेच शाळेच्या मुख्य इमारतीचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत-भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सैनिक स्कूलचे मुख्य कार्यकारी अधिकारी ले. कर्नल रत्नेश सिन्हा तसेच जनसंपर्क अधिकारी नितीन सांडये उपस्थित होते. या शाळेची एकूण प्रवेश क्षमता १६० विद्यार्थ्यांची असून त्यापैकी ४० जागा विद्यार्थिनींसाठी राखीव आहेत. दरवर्षी सहावी आणि नववी इयत्तेत प्रवेश दिला जाणार आहे. प्रवेश प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या 'AISSSEE' (All India Sainik School Entrance Examination) या परीक्षेद्वारे पार पडेल.

"सुमारे १५ एकरांवर उभारण्यात येणाऱ्या या शाळेच्या कॅम्पसमध्ये शैक्षणिक इमारती, ट्रेनिंग ब्लॉक्स, हॉस्टेल्स, ड्रिल ग्राउंड, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अशा सर्व सैनिकी शिक्षणाच्या अद्ययावत सुविधा उपलब्ध असतील. या इमारतींची उभारणी सध्या सुरू आहे. शाळेची औपचारिक प्रवेश प्रक्रिया १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. 'भोसले नॉलेज सिटी' ही अभियांत्रिकी, फार्मसी आणि विविध विषयांचे अत्याधुनिक शिक्षण देणारी, जिल्ह्यातील सर्वात भव्य आणि प्रतिष्ठित अशी एकमेव शिक्षणसंस्था आहे."

**अच्युत सावंत-भोसले, कार्याध्यक्ष श्री यशवंतराव भोसले एज्युकेशन सोसायटी**

# पुण्यात बिबट्यांचा उच्छाद! शेतकऱ्यांमध्ये भीती, महिलांचे शेतात गळ्याला पट्टा बांधून काम



■पुणे। प्रतिनिधी,

पुणे जिल्ह्यातील काही भागात बिबट्यांच्या दहशतीनं जगणं कठीण झालं आहे. स्थानिक नागरिक भीतीच्या सावटाखाली आहेत. जीव मुठीत धरून लोक घराबाहेर पडत आहेत. शेतमजूर महिला तर गळ्याला खिळ्यांचे पट्टे बांधून काम करत आहेत. अत्यंत भयावह परिस्थितीत असलेल्या स्थानिकांनी बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. मात्र अचानक बिबट्यांचे हल्ले का वाढलेत, त्याचा आढावा घेऊयात या रिपोर्टमधून.

गेल्या काही दिवसांपासून उत्तर पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या दहशतीनं प्रचंड भीती पसरली आहे. भरदिवसा हे बिबटे माणसांसह पाळीव प्राण्यांवर हल्ला करू लागले आहेत. पुणे जिल्ह्यातील शिरूर, आंबेगाव, खेडसह जुन्नर या पट्ट्यात बिबट्यांची संख्या वाढली आहे. थेट मानवी वस्तीत शिरकाव करून बिबटे हल्ले करत असल्यानं नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अचानक बिबट्यांचे हल्ले का वाढलेत असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

तर या परिसरात कुकडी प्रकल्पातील 5 धरणांमुळे बारमाई शेतीसाठी पाणी उपलब्ध असतं. त्यामुळं ऊस शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. परिणामी बिबट्यांना लपण्यासाठी उसाचं क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. तर भक्ष म्हणून शेतकऱ्यांकडून नुकतेच जन्मलेले जर्सी गाईचे गोरे खोंड मोकाट सोडले जातात. याचाच भक्ष म्हणून बिबटे उपयोग करतात. एकीकडे दुधाला बाजार भाव नाही तर दुसरीकडे हे खोंड सांभाळून याचा काही उपयोग होत नाही त्यामुळे शेतकरी हे खोंड मोकाट सोडून देत आहेत.

गोहत्या बंदीमुळे या गोऱ्यांना कत्तलीसाठी कुणी घेऊन जात नसल्यानं शेतकरी असे मोकाट सोडून देतात. त्यामुळे या परिसरात बिबट्यांची संख्या वाढली असून शासनाने या संदर्भात तातडीनं उपाययोजना करून गोहत्या बंदीसंदर्भातला विचार करून या गोऱ्यांना सांभाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी विनंती शेतकरी आता शासनाकडे करत आहेत.

तर शेतकऱ्यांनी असे गोरे मोकाट सोडून देण्याऐवजी वनविभागाशी संपर्क केला तर या गोऱ्यांचा भक्ष्य म्हणून पिंजऱ्यामध्ये ठेवण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो. बिबट्याला पकडण्यासाठी डार्टचे इंजेक्शन देण्यासाठी भक्ष म्हणून या गोऱ्यांचा उपयोग होऊ शकतो असं वनविभागानं म्हटलं आहे.

बिबट्याच्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी या भागातील मजूर महिला गळ्यात पट्टे बांधून शेतात काम करत आहेत. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे संपूर्ण परिसर दहशतीत आहे. आता तरी वनविभाग आणि सरकारनं याची दखल घ्यावी आणि तातडीनं बिबट्यांचा बंदोबस्त करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# कारमध्येच प्रसूती, बीड शहरात रक्त पाहून ड्रायव्हरला भोवळ, क्षणात कोवळ्या जिवासोबत...

■बीड। प्रतिनिधी,

महिलेची प्रसूती व्यवस्थित होणे म्हणजे एका प्रकारे तिचा पुनर्जन्मच असतो. प्रसूतीच्या प्रक्रियेत काही वैद्यकीय अडचणी आल्या तर मात्र डॉक्टरांना त्यांचे कौशल्य वापरून बाळ आणि आईचा जीव वाचवावा लागतो. कधीकधी मात्र प्रसूतीबाबत अजब चमत्कार पाहायला मिळतात.

सध्या एक फारच विदारक आणि थक्क करणारी घटना घडली आहे. बीड शहरात एका महिलेची थेट कारमध्येच प्रसूती झाली आहे. महिला प्रसूत झाल्यानंतर कारमधील रक्त पाहून कारचालकाला थेट चक्कर आली आहे. त्यानंतर कारचा अपघात झाला आहे.

**पहाटे पाच वाजता झाला अपघात, कार थेट...**

बीड शहरात सोमवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार बीडमधील पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरच हा विचित्र अपघात घडला. शहरातील कॅनाल रोडवर राहणाऱ्या एका महिलेला पहाटे अचानक प्रसूतीच्या वेदना सुरू झाल्या. त्यामुळे कुटुंबियांनी तिला खासगी रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिची कारमध्ये प्रसूती झाली. खासगी रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध नसल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला.

**रक्त पाहून चालकाला आल भोवळ**

यानंतर बाळ, माता आणि इतर दोन महिला आणि चालक असे पाचजण जिल्हा रुग्णालयाकडे जात होते. मात्र हा प्रवास चालू असतानाच पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर कारमधील रक्त पाहून चालकाला अचानक चक्कर आली. त्यामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या बाजूला काम सुरू असलेल्या नाल्यात जाऊन उलटली. काही समजायच्या आत हा अपघात झाला. चालकाला भोवळ आल्याने हा ही दुर्दैवी घटना घडली. चांगली बाब म्हणजे नुकतेच जन्मलेल्या बाळाला, प्रसूत झालेल्या मातेला गंभीर अशी इजा झाली नाही. कारमध्ये असलेल्या इतर महिलांनाही फार गंभीर दुखपात झालेली नाही. कारचा अपघात झालेला असला तरी बाळ आणि आई सुरक्षित असल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

# कर्जाच्या आमिषाने गंडा घालणाऱ्या ५ जणांना अटक

## कॉल सेंटरच्या माध्यामातून विदेशी नागरिकांची फसवणुक



■मुंबई। प्रतिनिधी,

कर्जाच्या आमिषाने विदेशी नागरिकांची फसवणुक करुन त्यांच्याकडून घेतलेल्या प्रोसेसिंग फीचा अपहार केल्याप्रकरणी पाच जणांच्या एका टोळीला मुलुंड पोलिसांनी अटक केली. सागर राजेश गुप्ता, अभिषेक सूर्यप्रकाश सिग, तन्मयकुमार रजनीश दादसिंग, शैलेश मनोहर शेट्टी आणि रोहन मोहम्मद अन्सारी अशी या पाचजणांची नावे आहेत. अटकेनंतर या पाचही आरोपींना स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या टोळीने कर्जाच्या आमिषाने आतापर्यंत अनेक विदेशी नागरिकांची फसवणुक केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन लॅपटॉप, अकरा मोबाईल, दोन राऊटर, ७६ हजाराची कॅश असा मुद्देमाल जप्त केला आहे.

मुलुंड येथे काहीजण बोगस आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरच्या माध्यमातून विदेशी नागरिकांची फसवणुक करत असल्याची माहिती मुलुंड पोलिसांना मिळाली होती. या माहितीची शहानिशा करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोशी यांच्या पथकातील पोलीस निरीक्षक शिवाजी चव्हाण, एपीआय सुनिल करांडे, मनोज पाटील, उपनिरीक्षक शिवानंद आपुणे, पोलीस अंमलदार उरणकर, आव्हाड, विंचू, कट्टे, ढेबे, बनसोडे, पवार यांनी मुलुंड कॉलनीतील एका निवासी इमारतीच्या फ्लॅटमध्ये छापा टाकला होता. यावेळी तिथे असलेल्या सागरसह त्याचे चार सहकारी अभिषेक, तन्मयकुमार, शैलेश आणि रोहन या पाचजणांना पोलिसांनी ताब्यात घेतला.

घटनास्थळी पोलिसांना एक बोगस आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर सुरु केल्याचे दिसून आले. लेंडीग पाईट या संस्थेचे पदाधिकारी असल्याचे भासवून, त्यांच्याकडील आंतरराष्ट्रीय ई-सिमकार्डचा वापर करुन सागर गुप्तासह इतर चौघेजण अमेरिका आणि कॅनडा देशातील नागरिकांना कॉल करत होते. त्यांना पे डे तत्त्वावर तात्काळ कर्ज देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून प्रोसेसिंग फी म्हणून काही रक्कम डॉलर स्वरुपात घेतली जात होती. मात्र ही रक्कम घेतल्यानंतर त्यांना कुठलेही कर्ज न देता त्यांची फसवणुक केली जात होती. घटनास्थळी पोलिसांना कर्ज मंजुरीचे काही कागदपत्रे सापडले आहे. या टोळीचा सागर गुप्ता असून त्याच्याकडे इतर चौघेही कामाला होते.

सागरने कॉल सेंटर चालविणयासाठी आवश्यक असलेले कोणतेही अधिकृत परवानगी घेतली नव्ती. तो त्याच्या इतर सहकार्यांच्या मदतीने बोगस आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर चालवून कर्जाच्या आमिषाने विदेशी नागरिकांची फसवणुक करत होता. त्यांच्याकडून प्रोसेसिंग फी घेऊन या पैशांचा अपहार करत होता. त्यांचा विश्वास बसावा म्हणून त्यांना कर्ज मंजुरीचे पत्र पाठविले जात होते. याप्रकरणी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच पाचही आरोपींना पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर या सर्वांना बुधवारी दुपारी मुलुंडच्या स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांची पोलिसांकडून चौकशी सुरु असून या चौकशीतून अनेक धक्कादायक खुलासे बाहेर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# पिंपरी-चिंचवड गोळीबाराने हादरलं, मित्रांनीच व्यावसायिकाला संपवलं

■कोल्हापूर। प्रतिनिधी,

पुणे जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटना झपाट्याने वाढल्या आहेत. काही दिवसांपूर्वी कोंढव्यात गणेश काळे नावाच्या व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. आता पिंपरी-चिंचवडमध्ये मित्रांनी एका व्यावसायिकावर गोळीबार केला आहे. यात ३७ वर्षीय नितीन शंकर गिलबिले यांचा मृत्यू झाला आहे. पिंपरी चिंचवड मधील चऱ्होली अलंकापुरम चौकाजवळ ही घटना घडली आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**नितीन शंकर गिलबिले यांच्यावर मित्रांकडून गोळीबार**

समोर आलेल्या माहितीनुसार, अलंकापुरम ९० फुटी रोडवर श्री साई रोड कॅरिअर या ठिकाणी साडेपाच ते ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. या ठिकाणी काळ्या रंगाच्या फॉर्च्यूनर गाडीत बसलेले असताना नितीन शंकर गिलबिले यांच्यावर त्यांचेच मित्र अमित जीवन पठारे आणि विक्रांत ठाकुर यांनी गोळीबार केला. या गोळीबारात नितीन गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांचा आता मृत्यू झाला आहे.

**हत्येमागे धक्कादायक कारण**

मयत नितीन गिलबिले आणि अमित पठारे, विक्रांत ठाकूर हे तिघेही एकमेकांचे मित्र असल्याची माहिती समोर आली आहे. हे तिघे जमिनीच्या प्लॉटिंगचा व्यवसाय करत होते. याच व्यवसायामधील व्यवहाराच्या वादातून हा गोळीबार केला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या गोळीबारानंतर अमित पठारे हे विक्रांत ठाकूर फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. या दोघांचा शोध घेतला जात असून पोलीसांनी या घटनेबाबत अधिक तपास सुरू केला आहे.

**महिन्याच्या सुरवातीलाही झाली होती हत्या**

याआधी १ नोव्हेंबरलाही पुण्यातील कोढवा परिसरात गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत गणेश काळे नावाच्या व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. गणेश काळेवर आंदेकर टोळीतील चार जणांनी सहा ते सात गोळ्या झाडल्या होत्या. गोळीबारानंतर त्याच्यावर कोयत्याने सपासप वार देखील करण्यात आले होते. कोंढवा परिसरातील खडी मशीन चौकात ही घटना घडली होती. गणेश काळे हा समीर काळे याचा भाऊ आहे. समीर हा सोमा गायकवाड टोळीतील सदस्य आहे. याच समीर काळेने वनराज आंदेकरच्या खूनात वापरलेली पिस्तूले मध्य प्रदेशातून आणली होती. समीर हा सध्या कारागृहात आहे. या घटनेनंतर आता पुन्हा एकदा पुण्यात गोळीबार करून हत्या करण्यात आली आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com